# MT- 162

**Seat No.** | | | | | | | |

**2013 .... .... 1100**

**MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - I**

**Time : 3 Hours** **(Pages 5)** **Max. Marks : 80**

---

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** **4**

१) दृष्ट लागावी असाच त्याचा ..........
अ) बंगला होता. ब) दिवाणखाना होता.
क) बंगल्याचा परिसर होता.

२) अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे ..........
अ) हे जग निर्माण झाले. ब) हे आनंदवन निर्माण झाले.
क) हे जंगल निर्माण झाले.

३) खेळ सुरू करण्यापूर्वी आम्ही अर्धा ते एक तास ..........
अ) सूतकताई करीत असू. ब) बागेत काम करत असू.
क) मैदान साफ करत असू.

४) एकदा मी पाऊस झालो, वाहत वाहत ..........
अ) नदीत गेलो. ब) ओढ्यात गेलो. क) समुद्रात गेलो.

**प्र.१. आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** **3**

१) स्वामीजी आपल्या शिष्यांसह त्या .......... बसले. (गाडीमध्ये, मोटारीमध्ये, बग्गीमध्ये)

२) मुंग्यांच्या पोरांनी ती .......... पाहायला गर्दी केली. (गंमत, मजा, नवलाई)

३) हे आनंदवन की .......... ? (नंदनवन, अशोकवन, ब्रम्हानंदवन)

**प्र.१. इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) नारायण सुर्वे कोणत्या मासिकाचे संपादक झाले ?

२) पन्हाळ्याचा दरगाह कोणत्या बादशहाने बांधला आहे ?

३) मुक्त तुरूंगात सारे कोण होते ?

**प्र.२. अ) खालीलपैकी कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' का असू शकत नाही ?

२) स्वामी विवेकानंद यांनी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे यासाठी चेतूने आग्रह कसा केला ?

३) निसर्गाशी संवाद साधायला हवा, असे लेखक का म्हणतात ?
४) नागिणीचे शहाणपण कोणत्या प्रसंगातून दिसून येते ?
५) आनंदवन कसं निर्माण झालं ?

**प्र.२. आ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **3**

१) ''हे उत्सव आवाज किंवा गर्दी या दोन्ही मुद्द्यांवर उपद्रवकारक ठरता कामा नयेत.''
२) ''गोट्या सुद्धा कधी हारजीत या भावनेने खेळलो नाही.''

**प्र.३. अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** **3**

१) माणूस खरे सुख कशात मानतो ?
२) वाऱ्यावरती काय विरून जात आहे ?
३) कवयित्रीस जीवन कसे वाटते ?

**प्र.३. आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **3**

१) दिसे .......... रूप त्याचे शिवारीं ! (सोजिरे, सांवळें, सुंदर)
२) गाऊ .......... गं. (पाऊसगाणी, मंगलगाणी, उजेडगाणी)
३) भावमय किमया ही .......... दौलतीची ? (हृदयीच्या, मनाच्या, काळजाच्या)

**प्र.४. अ) कोणत्याही <u>एका</u> पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **3**

१) अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ।।
आजि दिवाळी दसरा। सेना म्हणा आले घरा ।।
२) आपण यशोधरेच्या नाती, आपण जिजाऊच्या पाती, आपण सावित्रीच्या ज्योती
आपण रमाईच्या वाती, समतेचं अंगण, झिजणारं चंदन, करू रक्ताचं पाणी गं

**प्र.४. आ) कोणत्याही <u>तीन</u> प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** **9**

१) संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे ?
२) कवी ग.दि. माडगूळकर यांच्या मते, परमेश्वराचे दर्शन कोठे-कोठे घडते ?
३) कवीला गावातील आमराई, नदी, शेत का आवडते ?
४) कवीला त्याच्या घरट्यात कोणकोणत्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात ?
५) अन्यायाविरोधात लढणारी स्त्री कोणकोणत्या रूपांत कवितेतून व्यक्त झाली आहे ते सोदाहरण स्पष्ट करा.

**प्र.५. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.** **8**

१) पाण्याचे महत्त्व, अम्मा पत्रातून कशी लिहिते ?

२) स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागात कसे पसरले होते ते लिहा.

३) कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

४) आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला का वाटले?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** **8**

१) ‘मुलांचे स्वप्न’ या पाठाचा सारांश लिहा.

२) ‘गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व’ या पाठाचा सारांश लिहा.

**प्र.६. अ) खालीलपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमानुसार लिहा.** **2**

१) साऱ्या जातीपातिंचे, धरमांचे अडसर ओलांडायचे.

२) मुलांचे कौतुक दोघिंनाही सारखेच प्रीय असते.

**प्र.६. आ) खालीलपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** **2**

१) दागदागिने २) मायलेक ३) पंधरवडा ४) कमीअधिक

**प्र.६. इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१) प्रश्नांचे ओझे फार मोठे आहे. (उद्गारार्थी करा.)

२) माझा तरी किती वेडेपणा! (विधानार्थी करा.)

३) मानसन्मानाचा बडेजाव त्यांनी कधी केला नाही. (प्रश्नार्थी करा.)

**प्र.६. ई) कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** **4**

(दंगा करणे, हैराण करणे, कहर करणे, मन भरून येणे, घोटाळा होणे, भुसभुशीत करणे)

१. मुले विनाकारण मुक्या प्राण्यांना त्रास देतात.

२. शहरांत सध्या सिमेंटच्या जंगलांनी अतिरेक केला आहे.

३. नागिणीचे शहाणपण ऐकून मुंग्यांचे मन उचंबळून आले.

४. मोकळा वेळ मिळाला की सर्व मुलं मस्ती करतात.

५. शेतकरी शेताची मशागत करून जमीन मऊसूत करतो.

६. रमेशच्या बडबड्या स्वभावामुळे आमच्या अभ्यासात नेहमी गडबड होते.

प्र.७. **अ) खालील उतारा वाचून त्यावर <u>चार</u> प्रश्न तयार करा.** **4**

'श्यामची आई' मराठी वाङ्मय अमर करणारे साने गुरूजी म्हणजे मूर्तिमंत मातृभक्त होते. देवकोटीला पोहोचलेल्या विभुतींपैकी, संतांपैकी ते एक होते. बालकांवर अतिशय प्रेम करणारे ते वात्सल्यमूर्ती होते. प्रत्यक्ष जन्मदात्या आईबापांनीदेखील मुलांना निष्ठुरतेने वागविलेले त्यांना खपत नसे. मुलांची बाजू घेऊन ते आईबापांशी झगडायला देखील कमी करीत नसत. जगातले दुःख नष्ट व्हावे, अनाथ अपंगांना सुख मिळावे ही तळमळ साने गुरुजींच्या मनात अहर्निश उफाळत असे. आई ही सर्वात मोठी शिक्षक आणि घर हे उच्चतम विद्यामंदिर ही 'श्यामची आई' या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना आहे. आईने मुलांना कसे शिकवावे याचा आदर्श त्या कथेत त्यांनी सांगितलेला आहे. मुलांवर चांगले संस्कार करायचे असतील तर आईबापांनी आपले आचरण उदार आणि निर्मळ ठेवले पाहिजे. घरातच जातिभेदाला स्थान असेल तर त्याविरुद्ध बाहेर कोणी कितीही दांभिक बडबड केली तरी त्याचा तिळमात्रही परिणाम होणार नाही.

प्र.७. **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य <u>शीर्षक</u> देऊन <u>तात्पर्य</u> लिहा. (कोणतीही एक)** **4**

१) **मुद्दे :-** एक राजा – त्याच्याकडील गुलामाचा अपराध – गुलामास फाशीची शिक्षा – गुलामाचे रानात पळून जाणे – सिंहाच्या गुहेत आगमन – सिंहाच्या पायात काटा – वेदनेने व्याकुळ – गुलामाने सिंहाच्या पायातील काटा काढणे – जखम बरी – गुलाम पुन्हा पकडला जाणे – भुकेलेल्या सिंहाच्या पिंजऱ्यात टाकणे – सिंहाने गुलामाचे पाय चाटणे – तात्पर्य.

२) **मुद्दे :-** एक शेतकरी – स्वतःच्या विचाराने वागत नाही – एक म्हैस – खूप आवडती – चरायला नेणे – म्हैस पाणी पिण्यासाठी भटकणे – एक रांजण – तोंड घालणे – अडकणे – धडपड – काय करावे? – उंटावरून एक शहाणा – त्याने प्रकार पाहिला – मी खाली उतरणार नाही – उपाय सांगणे – मान कापा – पण डोके आतच – शहाण्याने सांगणे – आता रांजण फोडा – तात्पर्य.

प्र.७. **इ) खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> विषयावर पत्र लिहा.** **4**

१) संजय / संगिता जाधव, सरस्वती विद्यालय, जोगेश्वरी (प.), मुंबई. येथून विद्यार्थी प्रमुख या नात्याने व्यवस्थापक, आयडीयल ग्रंथ भांडार, महात्मा गांधी रोड, दादर (प.) मुंबई. यांच्याकडे आपल्या शाळेच्या ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करतो/ करते. (लिफाफा आवश्यक)

२) मिलिंद/मनिषा गवई, सरस्वती हायस्कूल,मुंबई येथून विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई यांना परीक्षा केंद्र बदलून मिळण्याबाबत पत्र लिहित आहे. त्याचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तांत लिहा.** **4**

तुमच्या विभागात संपन्न झालेल्या रक्तदान शिबिराचा वृत्तांत लिहा.

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** **4**

पाळणाघराची जाहिरात करा.

प्र.८. **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** **10**

१) श्रमाचे महत्त्व

(**मुद्दे :-** श्रम म्हणजे काय ? - श्रमाचे महत्त्व - श्रमाने मिळणारे आयुष्यातील यश - मानवाला श्रमाची आवश्यकता - आळस माणसाचा शत्रू - श्रमाने मात - श्रम कधीही वाया जात नाहीत - आधी मेहनत मग फळ - शेवट)

२) सूर्य उगवला नाही तर ....

(**मुद्दे :-** रोज शाळेत जाण्याचा व सकाळी उठण्याचा कंटाळा - सूर्य उगवला नाही तर, - फक्त रात्र - सर्वत्र अंधार - लवकर उठण्याची गरज नाही - फक्त झोप - शाळा, क्लास, गृहपाठ नाही - फक्त मनोरंजन आणि टि.व्ही - वाईट परिणाम - प्राणीमात्रांचे जीवन - प्रकाश कसा मिळणार - भयानक स्थिती - सकारात्मक विचार - शेवट.)

३) वृक्षाचे आत्मवृत्त

(**मुद्दे :-** जन्म - एखाद्या जंगलात - रोप असताना जीवन - हवा, ऊन, पाऊस यांचा परिणाम, मजा- वृक्षांत रूपांतर - कसे वाटले ? - पक्षी, फळे यांच्यापासून मिळणारा आनंद - वृक्षतोड - वृक्षतोडीविषयी मत - वृक्ष नसतील तर काय होईल परिणाम - शेवट)

**Best Of Luck** 👍

**PAPER - I**

# MT-162

**2013 .... .... 1100**

MT - 162 - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - PRELIM I - PAPER - I

**Time : 3 Hours** **Preliminary Model Answer Paper** **Max. Marks : 80**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **अ) योग्य पर्याय शोधून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| १) | दृष्ट लागावी असाच त्याचा **दिवाणखाना होता.** | 1 |
| २) | अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे **हे आनंदवन निर्माण झाले.** | 1 |
| ३) | खेळ सुरू करण्यापूर्वी आम्ही अर्धा ते एक तास **सूतकताई करीत असू.** | 1 |
| ४) | एकदा मी पाऊस झालो, वाहत वाहत **नदीत गेलो.** | 1 |
| उ.१. | **आ) रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| १) | स्वामीजी आपल्या शिष्यांसह त्या **बग्गीमध्ये** बसले. | 1 |
| २) | मुंग्यांच्या पोरांनी ती **नवलाई** पाहायला गर्दी केली. | 1 |
| ३) | हे आनंदवन की **ब्रम्हानंदवन** ? | 1 |
| उ.१. | **इ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | नारायण सुर्वे 'लोकवाङ्मयगृह' मासिकाचे संपादक झाले. | 1 |
| २) | पन्हाळ्याचा दरगाह आदिलशहा बादशहाने बांधला आहे. | 1 |
| ३) | मुक्त तुरूंगात सारे गुन्हेगार होते. | 1 |
| उ.२. | **अ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'संवाद, विसंवाद' हा पाठ लेखिका 'शांता शेळके' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने संवादाच्या विविध प्रकारांबद्दल त्यांतील अडथळ्यांबाबत माहिती सांगितली आहे.<br>मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपली अशी समजूत असते की, आपण खूप मुक्त, मोकळे असतो. पण ते खरे नसते. कारण आपल्याला एकमेकांचे गुणदोष जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात. त्यामुळे बऱ्याच वेळा मोकळ्या गप्पा होत असल्या तरी नात्यातल्या जवळीकीमुळे चमत्कारिक अवघडलेपणा वाट्याला येते. एकमेकांची मते, आग्रहदुराग्रह माहित असल्यामुळे बऱ्याचवेळा मतभेदाचे विषय आपण टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहित असल्यामुळे समोरच्या व्यक्तीचे मन दुखावले जाणार नाही याची आपण सतत काळजी घेतो.<br>या वरील कारणांमुळे मित्रमंडळींशी, जवळच्या माणसांशी होणारा संवाद हा 'मोकळा संवाद' असू शकत नाही असे लेखिका म्हणते. | 3 |

| | | |
|---|---|---|
| २) | ‘अपूर्व भेट’ हा पाठ लेखक ‘रणजित देसाई’ यांनी लिहिला आहे. या पाठात स्वामी विवेकानंदांचे भावचित्र राजा रविवर्मा यांना कसे भावले याचे चित्रण आलेले आहे.<br>स्वामीजी आसनस्थ झाल्यावर गोद वर्मा, राजा रविवर्मा व रामय्या यांनी त्यांची पाद्यपूजा केली. हे सर्व चालू असताना चेतू रविवर्म्याला आत येण्याबद्दल खुणावत होता. त्रस्त मनानं रविवर्मा आत गेला. आत जाताच चेतूने रविवर्म्याचे पाय धरले. त्याला उठवत संतापाने रविवर्म्याने त्याला दटावले. त्यावर चेतू डोळ्यांतील पाणी पुसत म्हणाला, ‘स्वामी तुमच्यामुळे देवदर्शन घडलं आहे. त्यांना आज घरात ठेवून घ्या. माझ्या गरिबाच्या हातचे चार घास त्यांनी स्वीकारले तर माझी कुळी उद्धरेल.’ हे सारं सांगताना चेतूचे शरीर गदगदा हलत होते. चेतूची अवस्था पाहून व्याकुळ झालेला रविवर्मा त्याला बळजबरीने स्वामीजींच्या समोर घेऊन आला. स्वामीजींना पाहताच चेतूने त्यांना साष्टांग नमस्कार घातला व ‘आपण हो म्हटल्याखेरीज हे पाय सोडणार नाही.’ असे म्हणत त्यांच्या पायांशी तसाच पडून राहिला.<br>अशाप्रकारे स्वामी विवेकानंदानी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे म्हणून चेतूने आग्रह केला. | 3 |
| ३) | ‘हिमालय’ हा पाठ लेखक ‘प्रभाकर पेंढारकर’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने हिमालयाचे मनाला मोहिनी घालणारे दर्शन घडविले आहे.<br>निसर्गसौंदर्य अनुभवायचे असेल तर केवळ त्याचे फोटो काढून पाहिले तर उपयोग नसतो. फोटोवरुन त्याची कल्पना येणे शक्य नसते. म्हणूनच लेखकाच्या मते निसर्गचित्र म्हणजे केवळ निसर्गदृश्य नसते. निसर्गाशी संवाद साधला तर निसर्ग आपणहून आपल्याशी बोलतो. सतलज नदीच्या प्रवाहाचा सतत चाललेला आवाज, पर्वतावरचा दगड त्या ओघात पडल्यावर उसळणाऱ्या पाण्याचा आवाज, पहाटेच्या वेळी पक्ष्यांची किलबिल, रात्री रातकिड्यांची किरकिर, मेघांचा गडगडाट, क्षणात चमकून जाणाऱ्या विजेचा कडकडाट, कधी वाऱ्याची भणभण तर कधी नुसतीच पानांची सळसळ हे सारे निसर्गाशी संवाद साधल्यावरच अनुभवायला मिळते.<br>अशाप्रकारे निसर्गाची वेगळी भाषा, त्याचे विविध शब्द अनुभवण्यासाठी निसर्गाशी संवाद साधायलाच हवा, असे लेखक म्हणतात. | 3 |
| ४) | ‘वारूळ’ हा पाठ लेखक ‘अनिल त्र्यंबक अवचट’ यांनी लिहिला आहे. या पाठात लेखकाने वारूळाविषयी मुंग्यांची भावना तसेच मुंग्या आणि नागिणीचे परस्परसंबंध स्पष्ट केले आहेत.<br>नागिणीच्या मुलांनी मुग्यांना वारूळ बनवताना मातीमध्ये सिमेंट मिसळा, घर वॉटर प्रूफ करून घ्या, असे काही बदल सुचवले. त्यावेळी नागिणीला आपली मुले माणसांच्या वळणावर जातात की काय अशी भीती वाटली. त्यावेळी मुलांना थांबवत ती म्हणाली की, नाग जेव्हा अन्न मिळवायला बाहेर फिरतात तेव्हा माणसे त्यांना दगड मारून त्रास | 3 |

| | | |
|---|---|---|
| | देतात. नागांनी उंदीर खाल्ले तर माणसाचाच फायदा होत असतो; पण हे त्यांना कळत नाही. जमीन भुसभुशीत करणारी वारूळे शेतात तयार केली की माणूस ती नांगरून, तोडून टाकतो. शिवाय माणसांनी सर्वत्र सिमेंट आणि डांबरी रस्ते बनवलेले आहेत. त्यांच्यामुळे सूर्य किरण जमिनीपर्यंत पोहोचतच नाही. त्यामुळे प्राण्यांनी जगायचं कसं हा प्रश्न निर्माण झाला आहे. खरे तर सारे जीव एकमेकांवर अवलंबून असतात आणि त्यामुळेच ही सृष्टी चालते. परंतु मनुष्य अविचाराने वागून स्वतःही मरेल आणि इतर उपयोगी प्राण्यांनाही मारेल. नागिणीचे निसर्गाचा समतोल साधण्यासाठीचे विचार मुंग्या शांतपणे ऐकत होत्या.<br>वरील प्रसंगातूनच नागिणीचे शहाणपण दिसून येते. | |
| ५) | 'माणुसकीचा झरा' हा पाठ लेखिका 'चित्रलेखा पुरंदरे' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने 'आनंदवन' ही कुष्ठरोग्यांची वसाहत निर्माण करण्यामागे बाबा आमटे यांची असलेली संवेदनशीलता दाखवून दिली आहे.<br>एक दिवस रस्त्याच्या कडेला असह्य वेदनांनी कण्हत असलेला, नासलेल्या शरीराचा तुळशीराम बाबांना दिसला. त्याची ती दुरावस्था बघून त्यांना खूप दुःख झाले. त्यावेळेपासूनच बाबांनी घरची श्रीमंती आणि सर्व सुखांचा त्याग करून आपले जीवन कुष्ठरोग्यांसाठी समर्पित केले. एका गरीब कुष्ठरोग्याला घरी आणून त्यांनी सर्व नातेवाईकांचा विरोध ओढावून घेतला. परंतु, याचवेळी सोबत म्हणून साधनाताईंच्या रूपात एक जीवाभावाचा माणूसही मिळाला. कष्टाशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही असे मानणाऱ्या साधनाताईंनी बाबांना संपूर्ण साथ दिली. परंतु दुर्दैवाने याचवेळी वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झाला. त्यावेळी दुःखी झालेल्या बाबांनी ताईंजवळ आपल्या अस्वस्थतेची, दुःखाची कबुली दिली. या दुःखाची तीव्रता कशी कमी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास यावेळी या पतीपत्नीला लागला. या ध्यासातूनच आनंदवनाची निर्मिती झाली.<br>अशाप्रकारे कुष्ठरोग्यांच्या दुःखाच्या सहानुभूतीतून आनंदवन निर्माण झाले. | 3 |
| उ.२.<br>१) | **आ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.**<br>**संदर्भ** : वरील वाक्य 'परिवर्तनाचे उत्सव' या लेखिका 'विद्या बाळ' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात निसर्गातील ऋतुबदलानुसार जे उत्सव साजरे केले जातात त्यात काळानुसार परिवर्तन करणे आवश्यक आहे हा विचार मांडला आहे.<br>**स्पष्टीकरण** : निसर्गातील ऋतुबदल हा निसर्गाचा सोहळाच असतो. या ऋतुबदलाला साजेसे काही सांस्कृतिक, धार्मिक उपक्रम आपण मित्रमैत्रिणींसोबत पारंपरिक पद्धतीने साजरे करत असतो. लेखिकेच्या मते, आपण त्यात काळानुसार बदल करणे आवश्यक आहे. सर्व जातीधर्मांच्या, सर्व स्त्रीपुरूषांना सामावून घेऊन निसर्गाशी नाते जोडत आनंदाने हे उत्सव साजरे केले पाहिजेत. त्यासाठी आपण काही मर्यादांचे पालन केले पाहिजे. ते साजरे करताना होणाऱ्या आवाजाचा इतर कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी आपण | 3 |

| | | |
|---|---|---|
| | घेतली पाहिजे. त्याचबरोबर होणाऱ्या गर्दीची रस्त्यावरच्या रहदारीला अजिबात अडचण होणार नाही याकडेही लक्ष दिले पाहिजे. हे समजावून सांगण्यासाठीच लेखिकेने वरील विधान केले आहे.<br>**वैशिष्ट्य :** सामाजिक बांधिलकीची जाणीव येथे दिसून येते. | |
| २) | **संदर्भ :** वरील वाक्य 'शाश्वत शिक्षणसंपत्ती' या लेखक 'चंद्रशेखर धर्माधिकारी' यांच्या पाठातून घेण्यात आले आहे. या पाठात लेखकाने त्यांच्या शिक्षकांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करत त्यांच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला आहे.<br>**स्पष्टीकरण :** खादी व स्वदेशी हेच लेखकाचे जीवनव्रत होते. त्यामुळे त्यांनी जीवनात कधीही चंगळवादाला जागा दिली नाही. या सर्वांमुळे एक आगळीवेगळी स्वायत्त गरिबी त्यांनी उपभोगली. जीवनात खेळ म्हटला की चढाओढ, चुरस आली. दुसऱ्यावर विजय मिळवण्याची तीव्र भावना त्यावेळी मनात असते. खेळात स्वतःचाच फायदा कसा अधिक होईल या विचाराने दुसऱ्याच्या होणाऱ्या नुकसानीची, दुःखाची त्यावेळी जाणीव होत नाही. आपल्यामुळे इतरांना नाहक त्रास होणार नाही ही भावना मनात असल्याने लेखक म्हणतात की, ते गोट्यासुद्धा कधी हारजीत या भावनेने खेळले नाहीत. अशा खेळाचा आनंदही कोट्यवधी रूपयांपेक्षा जास्त होता.<br>**वैशिष्ट्य :** लेखकाच्या मनातील संवेदनशीलता येथे प्रत्ययास येते. | **3** |
| उ.३. | **अ) खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.** | |
| १) | माणूस खरे सुख संसारात मानतो. | **1** |
| २) | वाऱ्यावरती बेचैनीचे भाव विरून जात आहेत. | **1** |
| ३) | कवयित्रीस जीवन दुर्मिळ, सुंदर वाटते. | **1** |
| उ.३. | **आ) रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** | |
| १) | दिसे **सांवळें** रूप त्याचे शिवारीं ! | **1** |
| २) | गाऊ **उजेडगाणी** गं. | **1** |
| ३) | भावमय किमया ही **हृदयीच्या** दौलतीची ? | **1** |
| उ.४. | **अ) कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** | |
| १) | **संदर्भ :** वरील पद्यपंक्ती 'आजि सोनियाचा दिवस' या 'संत सेना महाराज' यांच्या अभंगातून घेण्यात आल्या आहेत. संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन या अभंगामध्ये केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** संतांच्या सहवासात खूप आनंद मिळतो. संत सान्निध्यात राहिल्यामुळे संत सेना महाराज यांच्या मनातील वाईट विचारांचा नाश झाला व मनाला शांतता लाभली. संतचरण दिसल्यामुळे मनाचा व शरीराचा सारा थकवा दूर झाला आहे. दिवाळी-दसरा | **3** |

| | | |
|---|---|---|
| | आल्यावर आनंदाला तोटा नसतो. घरी सुखाचे, समाधानाचे वातावरण असते. त्याचप्रमाणे संतांच्या भेटीमुळे सेना महाराज यांच्या मनाला दिवाळी-दसऱ्याप्रमाणे आनंद झाला आहे.<br>**वैशिष्ट्य :** येथे संत सेना महाराजांची आनंदी मनोवस्था दिसून येते. | |
| २) | **संदर्भ :** वरील पद्यपंक्ती 'आपण धरणी गं' या कवी 'ऋषीकेश कांबळे' यांच्या कवितेतून घेण्यात आल्या आहेत. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन कवितेतील स्त्रीच्या माध्यमातून केले आहे.<br>**स्पष्टीकरण :** कवितेतील स्त्री समाजातील स्त्रियांना स्फूर्ती देण्यासाठी अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची उदाहरणे देऊन त्यांच्यानुसार वागण्याचा आग्रह करत आहे. ती म्हणते आपण सहनशील यशोधरेच्या नाती आहोत. छत्रपतींना घडविणाऱ्या जिजाऊंच्या पाती आहोत. ज्ञानज्योत पेटविणाऱ्या सावित्रीच्या ज्योती आहोत. अज्ञानाचा अंधार दूर करणाऱ्या रमाईच्या वाती आहोत. आपल्याला उज्ज्वल अशी परंपरा लाभली आहे. म्हणूनच समाजात मिळणारी दुय्यम, विषमतेची वागणूक झुगारून समतेच्या हक्कांसाठी चंदनाप्रमाणे झिजूया. स्वतःला सिद्ध करण्यासाठी प्रसंगी रक्ताचे पाणी करूया आणि आपला मान-सन्मान मिळवूया.<br>**वैशिष्ट्य :** महाराष्ट्रातील श्रेष्ठ स्त्री परंपरेची ओळख येथे करून दिली आहे. | **3** |
| उ.४. | **आ) कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ५० ते ६० शब्दांत लिहा.** | |
| १) | 'आजि सोनियाचा दिवस' हा अभंग 'संत सेना महाराज' यांनी लिहिला आहे. या अंभगात संतांच्या सान्निध्यात मिळणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे.<br>संत सेना महाराज म्हणतात की, संतांचे दर्शन झाल्यामुळे हा दिवस माझ्यासाठी सोन्यासारखा झाला आहे. संतांच्या सान्निध्यात राहिल्यामुळे त्यांच्या जीवाला सुख प्राप्त झाले आहे. जसे सासरी गेलेल्या मुलीला माहेरची माणसे भेटल्यावर आनंद, सुख प्राप्त होते. तसाच सर्व संतमेळा पाहून आपल्या माणसांना भेटल्याचा आनंद संत सेना महाराज यांना झाला आहे. त्यांच्या मनातील दुःख दूर होऊन त्यांच्या मनाला शांतता प्राप्त झाली आहे. जीवाचा सारा थकवा दूर झाला आहे. अशाप्रकारे संतचरण पाहिल्यामुळे जणू घराला सण उत्सवाचे रूप आले आहे. ज्याप्रमाणे दिवाळी-दसरा आल्यावर मन आनंदी, उत्साही होते त्याप्रमाणे संतांच्या सान्निध्यात मन आनंदाने, सुखाने भरून गेले आहे.<br>अशाप्रकारे संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन केले आहे. | **3** |
| २) | 'जिथे राबती हात' ही कविता कवी 'ग. दि. माडगूळकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत कवीने आपल्या जीवनातील श्रमाचे महत्त्व सांगितले आहे.<br>कवी ग. दि. माडगूळकर म्हणतात की, ज्या ठिकाणी माणसे कष्ट करतात, घाम गाळतात तेथे विविध रूपात परमेश्वर उभा राहतो. शेतकरी आपल्या शेतात खूप राबतात, मेहनत करतात. त्याठिकाणी अन्नाच्या रूपात परमेश्वर उभा राहतो. अशा शेतात परमेश्वराचे सावळे रूप दिसते. पाथरवट लोक रस्त्यावर बसून दगड फोडतात. दगडांना विविध आकार | **3** |

| | | |
|---|---|---|
| | देतात. शिवाय विणकर लोक कापसापासून सुंदर कापड तयार करतात. अशा मेहनत करणाऱ्या लोकांच्या घरी परमेश्वर आनंदाने राहतो.<br>अशाप्रकारे कवी ग.दि.माडगूळरांच्या मते, ज्या ठिकाणी कष्ट केले जातात, त्याठिकाणी परमेश्वराचे दर्शन घडते. | |
| ३) | 'गाव' ही कविता कवी 'अनिल पाटील' यांनी लिहिली आहे. या कवितेतून कवीची गावाबद्दलची ओढ व्यक्त झाली आहे.<br>पोटापाण्यासाठी दूर शहरात गेलेल्या कवीला गावाची खूप आठवण येते. या आठवणीत त्याला बाभळीच्या बनाशेजारी असलेल्या आमराईची आठवण येते. ज्या आमराईमध्ये त्याला शांत, स्वस्थ वाटायचे त्या आमराईच्या गर्द, घनदाट सावलीमध्ये छान झोप लागायची. त्यावेळी वारा जणू अंगाई गात वाहतो आहे असे वाटायचे. कवीला वेडीवाकडी वळणे घेत वाहणाऱ्या नदीतील खळाळतं पाणीसुद्धा पाहायला आवडायचे. गावातील सौंदर्य पाहताना कवीची नजर पाखरासारखी भिरभिरायची. या नजरेसमोर काळ्याभोर शेतातील हिरवेगार पीकही उभे राहायचे. त्या शेतात कवीचे मन रेंगाळायचे. गावच्या या निसर्गसौंदर्याने कवीचे तन, मन अगदी धुंद होत असायचे.<br>अशाप्रकारे वरील कारणांमुळेच कवीला गावातील आमराई, नदी, शेत आवडते. | 3 |
| ४) | 'माझ्या घरट्यात' ही कविता कवी 'सूर्यकांत खांडेकर' यांनी लिहिली आहे. या कवितेत भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती अधिक महत्त्वाची असते, हा संदेश व्यक्त होतो.<br>कवीला आपल्या घरट्यात हिऱ्यामाणकांच्या राशीपेक्षा भावपूर्ण प्रेमळ अशी श्रीमंत हृदयाची माणसे महत्त्वाची वाटतात. कवीला घरात कल्पफुलांपेक्षा खऱ्या पारिजातकांच्या फुलांचा सभोवार दरवळणारा सुगंध अधिक महत्त्वाचा वाटतो. म्हणजेच खऱ्या प्रेमाचा, पावित्र्याचा गंध कवीला अनमोल वाटतो. कवीला केवळ स्वप्नरंजकतेपेक्षा स्वप्ने साकार करणारी मेहनती माणसे महत्त्वाची वाटतात. घरातील माणसांचा एकमेकांशी असणारा संवाद, विचारांतील एकोपा कवीला अधिक पसंत आहे. घरातील आनंदी वातावरण आणि मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य कवीला अधिक आवडते.<br>अशाप्रकारे कवीला आपल्या घरट्यात भौतिक श्रीमंतीपेक्षा हृदयाची श्रीमंती दर्शविणाऱ्या गोष्टी महत्त्वाच्या वाटतात. | 3 |
| ५) | 'आपण धरणी गं' ही कविता कवी 'ऋषीकेश कांबळे' यांनी लिहिली आहे. या कवितेत स्त्रीला तिच्या सामर्थ्याची जाणीव करून देत आपले हक्क मिळवण्याचे आवाहन केले आहे.<br>कवितेतील स्त्री म्हणते की, स्त्री ही नवनिर्मिती करणाऱ्या धरणीचे रूप आहे. ती जशी सहनशील आहे तशीच धैर्यशीलही आहे. हे सगळे गुण आपल्या अंगी असूनही आपणाला का झुरत जगावं लागत आहे, असे ती विचारते. यावेळी ती स्त्री-शक्तीला जागृत करताना म्हणते की, आता मात्र आपले हक्क मिळविण्यासाठी अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी सज्ज | 3 |

झाले पाहिजे. त्यासाठी ती सहकारी स्त्रियांना वाघवाघिणीचे रूप घेऊन आपले दुःख व अन्याय नष्ट केला पाहिजे असे ती सांगते. आजच्या नव्या युगातील या लढाऊ स्त्रीला कर्तबगार स्त्रियांचा थोर वारसा लाभला आहे. ती म्हणते की, आपण भगवान बुद्धांची पत्नी यशोधरेच्या नाती आहोत. शिवरायांना जन्म देणाऱ्या जिजाऊ मातेचे वंशज आहोत. तसेच सावित्रीबाई फुले यांनी पेटविलेल्या ज्ञानाच्या ज्योती तर रमाबाईंनी प्रज्वलित केलेल्या ज्ञानाच्या वाती आहोत. अशी थोर परंपरा लाभल्यामुळे आपणही चंदनासारखे झिजून, आपल्या रक्ताचं पाणी करून समाजात समता निर्माण केली पाहिजे. पुढे ती स्वतःला दिव्याची उपमा देते. आपणही दिवा होऊन जळू व उजेडाची म्हणजेच आपल्या यशाची, स्वातंत्र्याची गाणी गाऊया असे ती आपल्या स्त्री-सहकाऱ्यांना सांगते.

अशा प्रकारे अन्यायाविरोधात लढणारी स्त्री धरणी, वाघवाघिणी, इतिहासातील थोर स्त्रिया, चंदन व दिवा या रूपांत कवितेतून व्यक्त झाली आहे.

उ.५. **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० शब्दांत लिहा.**

१) 'नातवंडांस पत्र' हा पाठ लेखिका 'मृणालिनी साराभाई' यांनी लिहिला आहे. या पाठात लेखिकेने आपल्या नातवंडांना जगत असताना आपल्याला आनंद देणाऱ्या प्रत्येक गोष्टीबाबत आपण कृतज्ञ असले पाहिजे, हा मोलाचा संदेश पत्राच्या माध्यमातून दिला आहे. 4

पाण्याचे महत्त्व सांगताना अम्मा लिहिते की, स्नान करताना आपण पर्वतांमधून, खोल खोल दऱ्याखोऱ्यांमधून व महान नद्यांतून येणाऱ्या आशीर्वाद स्वरूप पाण्याचे स्मरण ठेवावे. कोणतेही जीवन पाण्याविना अशक्य आहे. पिण्यासाठी जर एकही थेंब मिळाला नाहीतर आपली अवस्था खूप वाईट होईल. तेव्हा पाण्याबाबत खबरदारी घ्यावी. त्याचा एकही थेंब वाया जाणार नाही, याची काळजी घ्यावी. आपण देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवायला मदत करायला हवी, अशी शपथ घेऊया. ज्यामुळे सगळ्या लोकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळेल. त्याचबरोबर पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे.

अशाप्रकारे अम्मा पत्रातून पाण्याचे महत्त्व नातवंडांना समजावून सांगते.

२) 'प्रतिसरकार' हा पाठ लेखक 'नागनाथअण्णा नायकवडी' यांनी लिहिला आहे. या पाठात सातारा जिल्ह्यातील इंग्रजी शासनाच्या जोखडातून मुक्त अशा प्रतिसरकारच्या स्थापनेचे स्फूर्तिदायक वर्णन केले आहे. 4

१९४२ ला मुंबई येथील गवालिया टँक येथे गांधीजींनी इंग्रज सत्तेच्या विरोधात 'चले जाव' ची घोषणा दिली. त्यावेळी अनेक राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगतही झाले. देशभरात सगळीकडे 'चले जाव' आंदोलन तीव्र बनले. या आंदोलनाचे लोण ग्रामीण भागातही पसरले. अनेक ठिकाणी प्रचंड जमावानी इंग्रज सत्तेविरूद्धचा असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलीस ठाणे, पोष्ट, टेलिफोनच्या तारा तोडल्या होत्या. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी हरताळ पाळले होते. सातारा जिल्ह्यात कराड, पाटण, तासगांव, वडूज, इस्लामपूर, शिराळा, आटपाडी येथे मामलेदार

| | | |
|---|---|---|
| | कचेरीवर मोर्चे निघाले होते. इंग्रजांनी या प्रचंड मोर्चावर गोळीबार केला. त्यामध्ये वडूज मोर्चात ९ तर इस्लामपूर मोर्चात २ कार्यकर्ते हुतात्मा झाले. अनेकजण जखमी झाले. अनेकांना तुरूंगात डांबले गेले. त्यातूनच पुढे स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे, या विचाराने गावागावात 'प्रतिसरकार' निर्माण करावयाची कल्पना पुढे आली.<br>अशाप्रकारे स्वातंत्र्य चळवळीचे लोण ग्रामीण भागातही पसरले. | |
| ३) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>लेखक हायस्कूलमध्ये शिकत असताना त्याला गुळाच्या गाड्यांबरोबर जावे लागे. शाहूपुरीतील अडत दुकानात उतरून गुळाचा हिशोब घेऊन येण्याची जबाबदारी वडिलांनी त्याच्यावर सोपवलेली होती. कोल्हापुरात त्यावेळी गुऱ्हाळांचा एक विशिष्ट काळ असे. हा गुळ कोल्हापुरी गुळ म्हणून प्रसिद्ध होता. तो खरेदी करण्यासाठी गुजरातहून व्यापारी मंडळी येत. कोल्हापुरी गुळाची चव खास आहे. हा ताजा गूळ शाहूपुरीत सर्वत्र ढेपाढेपांनी रचलेला दिसे. त्याचा गंध आल्यानंतर तो खाण्याचा मोह कोणालाही होई. त्याचा रंगही असाच मनाला आकर्षित करणारा असे. कोल्हापुरी गुळाच्या चवीचे आणि रंगगंधाचे हे वैशिष्ट्य या पंचक्रोशीतील 'माती'च्या गुणातूनच निर्माण झालेले आहे.<br>अशाप्रकारे लेखकाने कोल्हापुरी गुळाचे वर्णन केले आहे. | **4** |
| ४) | 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>चिनारचे आई व बाबा दोघंही एक छोटं हॉटेल चालवायचे. दोघेही दिवसभर या ना त्या कामात गुरफटलेले असायचे. आईबाबांची कामांची धांदल चिनारला कळायची. त्याला आपले आईबाबा खूप आवडायचे. चिनारचे आईबाबाही आपल्या चिनारचे कौतुक करायचे. त्याच्या शेजारचेही आपल्या मुलांना सांगायचे, ''बघा...बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.'' खरं तर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनारचे आईबाबा हॉटेलात दिवसभर काम करून फार दमायचे. कधी कधी तर चिनारचा अभ्यास घ्यायलाही त्यांना वेळ मिळत नसे. अशा वेळी आपल्या आईबाबांचे पाय दाबून द्यावेत, डोक्याला तेल लावावे, हॉटेलात काहीतरी मदत करावी असे चिनारला खूप वाटायचं. पण वेळच मिळत नाही. मनातून वाटूनसुद्धा आपण त्यांना काहीच मदत करत नाही. चांगली मुलं सगळ्यांना मदत करतात. आपण मात्र मदत करीत नाही. तरीही आपल्याला लोकांनी चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे चिनारला वाटते.<br>अशाप्रकारे स्तुतीस पात्र नसतानाही लोकांनी केलेल्या स्तुतीमुळे आपण खोटारडे आहोत, असे चिनारला वाटते. | **4** |

| | | |
|---|---|---|
| | किंवा<br>**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.** | **8** |
| १) | 'मुलांचे स्वप्न' हा पाठ लेखिका 'सोनाली नवांगुळ' यांनी लिहिला आहे. या पाठात मानवी स्वभाव आणि वृक्षांची दातृत्वाची, सहकार्याची वृत्ती याचे रंजक वर्णन केले आहे.<br>जुई आणि चिनार ही शहाणी मुलं होती. त्यांच्या शेजारचे आपल्या मुलांना सांगायचे, 'बघा, बघा किती शहाणी मुलं आहेत. आईबाबांना दमवत नाहीत. अभ्यास करतात. उलटं बोलत नाहीत.' खरंतर अशा कौतुकाचा कुणालाही आनंदच होतो. पण चिनार आणि जुईला मात्र वाईट वाटायचे. चिनार आणि जुईचे आईबाबा काम करून खूप दमायचे. चिनारचे आई व बाबा दोघंही मिळून एक छोटं हॉटेल चालवायचे. जुईची आई वाचनालयात कामाला जायची आणि बाबा घरातल्या हॉलमध्ये मुलांची शिकवणी घ्यायचे. चिनार आणि जुई या दोघांना वेळच मिळत नसल्यामुळे मनात इच्छा असूनसुद्धा दोघेही आईवडिलांना कामात मदत करू शकत नव्हते. तरीही लोकांनी त्यांना चांगलं म्हटलं तर आपण खोटारडेच आहोत, असे वाटून त्यांना त्या गोष्टीचं वाईट वाटायचे.<br>एके रविवारी जुई आणि चिनार एकमेकांना भेटले. चालता चालता एक फूल टपकुन चिनारच्या डोक्यात पडले. जुईनेही फुलांच्या सड्यावर नजर टाकली. दोघांच्या डोक्यात एकाचवेळी एक विचार आला. कोणतेही झाड असो, ते किती उपयोगी पडते. त्यामुळे कसंही करून आपण झाड व्हायचं आणि सगळ्यांना खूप मदत करायची. आपल्याला झाड बनवावे यासाठी जुई आणि चिनार भैरू जादूगाराला भेटले.<br>भैरू जादूगर या विचित्र मागणीने चक्रावला. भैरू जादूगाराने जुई आणि चिनारची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण चिनार, जुई आपल्या म्हणण्यावरून हटले नाहीत. शेवटी जादूगाराला कबूल करावे लागले. भैरू जादूगाराने चिनार आणि जुईला संमोहित केले. चिनार चिंचेचे झाड आणि जुई चाफ्याचे झाड झाली होती. पण झाड झाल्यावर त्यांना बोलता येत नव्हते, हलता येत नव्हते. शेवटी ज्याला जे अवयव मिळालेत त्यांनी त्यांचा उपयोग करून शक्य तितकी मदत एकमेकांना करावी हे चिनार आणि जुईला पटले. झाडे खोड, पानं, फुलं, फळं, मुळं या अवयवांचा उपयोग करून मदत करतात. तसेच आपण हात, पाय, डोळे, बुद्धी, मन यांचा उपयोग करून जमेल ती मदत करायला हवी, असे चिनार आणि जुई यांच्या बालमनाला पटले. | |
| २) | 'गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व' हा पाठ लेखक 'आनंद यादव' यांनी लिहिला आहे. या पाठात एकच मराठी संस्कृती असलेल्या खेड्यांची, शहरांची वेगवेगळी सांस्कृतिक वैशिष्ट्ये व त्यातून दिसणारे त्या त्या गावाचे व्यक्तिमत्त्व यांचे वर्णन लेखकाने केले आहे.<br>संस्कृतीची बाह्य वैशिष्ट्ये ही गावागावाच्या वैशिष्ट्यांवर आणि शहराशहरांच्या वैशिष्ट्यांवर अवलंबून असतात. हा विचार मांडताना लेखकाने कोल्हापूर, पंढरपूर व रत्नागिरी या तीन गावांच्या संस्कृतींचे वर्णन केले आहे. लेखक म्हणतात की, सकाळच्या वेळी कोल्हापुरच्या रस्त्यावरून लांब शिंगाच्या गवळट म्हशी दूधकट्ट्यावर दुधाच्या धंद्यासाठी | **8** |

| | | |
|---|---|---|
| | जात असतात. त्याचवेळी पैलवानांचे समूह हातात कल्हई केलेल्या पितळी बादल्या घेऊन दूधकट्ट्यावर जातात. ते पैलवान म्हशीचे ताजे निरसे दूध विकत घेऊन पितात आणि आखाड्यात मेहनतीसाठी जातात. शिवाय काही लोक पंचगंगेच्या घाटावर आंघोळीसाठी जातात. कोल्हापुरी संस्कृतीचे हे खास वैशिष्ट्य आहे. एकट्या कोल्हापुरात जेवढ्या तालमी आहेत तेवढ्या तालमी महाराष्ट्रातील कोणत्याही शहरात दिसणार नाहीत. त्याचबरोबर इथला गुळही स्वतःचे वैशिष्ट्य असलेला आहे. त्याच्या रंगामुळे आणि गंधामुळे कोणालाही तो गूळ खाण्याचा मोह होतोच. | |
| | कोल्हापूरप्रमाणे पंढरपुरला स्वतःची वेगळी संस्कृती आहे. येथील संस्कृती वर्षातून दोनदा येणाऱ्या वारीवर बेतलेली आहे. विठ्ठल मंदिर हे येथील संस्कृतीचे केंद्र आहे. त्यामुळे पंढरपुरात खूप मठ आहेत. वारीच्या वेळी महाराष्ट्रातील हरिभक्त आणि वारकरी या मठात उतरतात. इथल्या गल्ल्यांना, चौकांना आणि दुकानांनाही साधुसंतांची नावे दिलेली आहेत. नदीच्या वाळवंटात टाळ मृदुंग फक्त पंढरपुरातच वाजतात. शिवाय येथल्या चंद्रभागा नदीवरील स्नानाला पावित्र्याचा स्पर्श असतो. विठ्ठलाचे ध्यान करीत स्नान केले जाते. स्नानानंतर लोक घरी न जाता प्रथम विठ्ठल मंदिराकडे जातात. त्यानंतर घरी जातात. असे हे भक्तियुक्त मानसिक वैशिष्ट्य दुसऱ्या कुठल्याही मराठी शहरी संस्कृतीमध्ये दिसत नाही. | |
| | कोल्हापूर, पंढरपूर या शहरांप्रमाणेच रत्नागिरीच्या वेगळ्या संस्कृतीची लेखकाने ओळख करून दिली आहे. लेखक म्हणतात की, रत्नागिरीला लाल लाल मातीच्या रस्त्यांचे सुंदर देखणेपण लाभलेले आहे. समुद्राच्या लाटांचा आवाज वातावरणात गंभीरपणे भरून राहिलेला असतो. येथे पावसाळ्यात आणि हिवाळ्यातही थंडी वाजत नाही, या गोष्टीचे लेखकाला खूप आश्चर्य वाटते. त्याचबरोबर इथला मासळीबाजार खूप मोठा आहे. आणि या मासळी बाजारातील उग्र वास ही रत्नागिरीची एक ओळख आहे. | |
| उ.६. | **अ) खालीलपैकी कोणतेही <u>एक</u> वाक्य लेखननियमानुसार लिहा.** | |
| १) | साऱ्या **<u>जातीपातींचे</u>**, **<u>धर्मांचे</u>** अडसर ओलांडायचे. | 2 |
| २) | मुलांचे कौतुक **<u>दोघींनाही</u>** सारखेच **<u>प्रिय</u>** असते. | 2 |
| उ.६. | **आ) खालीलपैकी कोणत्याही <u>दोन</u> सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.** | |
| १) | दागदागिने - दाग, दागिने वगैरे - समाहार द्वंद्व समास | 1 |
| २) | मायलेक - माय आणि लेक - इतरेतर द्वंद्व समास | 1 |
| ३) | पंधरवडा - पंधरा दिवसांचा समूह - द्विगू समास | 1 |
| ४) | कमीअधिक - कमी किंवा अधिक - वैकल्पिक द्वंद्व समास | 1 |
| उ.६. | **इ) कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्ये लिहा. (कोणतेही दोन)** | |
| १) | किती मोठे आहे प्रश्नांचे ओझे ! | 1 |
| २) | माझा खूपच वेडेपणा आहे / होता. | 1 |
| ३) | मानसन्मानाचा बडेजाव त्यांनी कधी केला का ? | 1 |

| | | |
|---|---|---|
| उ.६. | **ई) कंसात दिलेल्या वाक्यप्रचारांचा योग्य वापर करून वाक्ये लिहा. (कोणतेही चार)** | |
| १) | मुले विनाकारण मुक्या प्राण्यांना **हैराण करतात**. | **1** |
| २) | शहरांत सध्या सिमेंटच्या जंगलांनी **कहर केला आहे**. | **1** |
| ३) | नागिणीचे शहाणपण ऐकून मुंग्यांचे **मन भरून आले**. | **1** |
| ४) | मोकळा वेळ मिळाला की सर्व मुलं **दंगा करतात**. | **1** |
| ५) | शेतकरी शेताची मशागत करून जमीन **भुसभुशीत करतो**. | **1** |
| ६) | रमेशच्या बडबड्या स्वभावामुळे आमच्या अभ्यासात नेहमी **घोटाळा होतो**. | **1** |
| | | |
| उ.७. | **अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** | |
| १) | 'श्यामची आई' या पुस्तकाचे लेखक कोण ? | **1** |
| २) | 'श्यामची आई' या पुस्तकाची मध्यवर्ती कल्पना कोणती ? | **1** |
| ३) | मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी त्यांच्या आईबापांनी काय केले पाहिजे ? | **1** |
| ४) | साने गुरूजींच्या मनात कोणती तळमळ उफाळत असे ? | **1** |
| | | |
| उ.७. | **आ) खाली दिलेल्या मुद्यांवरून गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतीही एक)** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 51 - Q.01 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 55 - Q.07 | **4** |
| | | |
| उ.७. | **इ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 86 - Q.01 | **4** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 92 - Q.07 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर वृत्तांत लिहा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 100 - Q.01 | **4** |
| | **किंवा** | |
| उ.७. | **इ) खालील विषयावर जाहिरात लेखन करा.** | |
| | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 108 - Q.02 | **4** |
| | | |
| उ.८. | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** | |
| १) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 03 - Q.03 | **10** |
| २) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 22 - Q.19 | **10** |
| ३) | Refer MT Edu Solution - Marathi Writing Skills - Page No. 34 - Q.31 | **10** |